# प्रसिध्दी पत्रक

**आरोपी विजय सिताराम सरकटे, वय ५८ वर्षे, सेवा निवृत्त शाखा अभियंता, पंचायत समिती वैजापुर, जि. औरंगाबाद यांनी ११,०००/- रु लाच स्विकारल्या नंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | विजय सिताराम सरकटे, वय ५८ वर्षे, सेवा निवृत्त शाखा अभियंता, पंचायत समिती वैजापुर, जि. औरंगाबाद.<br>रा. घर नंबर ३३, श्रीनिकेतन कॉलनी, हॉटेल अमरप्रीत च्या पाठीमागे, औरंगाबाद. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे क्रांतीचौक, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपासी अधिकारी | :- | श्री. संदीप राजपुत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ११,०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे खासदार निधीतील मंजुर मौजे शाहजतपुर,ता.वैजापुर येथील व्यायाम शाळेचे बांधकाम साहित्य पुरविल्याबाबतचा उर्वरीत रकमेच्या बीलाचा चेक मिळवून देणेसाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | आरोपी यांचे राहते घरी. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचे खासदार निधीतील मंजुर मौजे शाहजतपुर, ता वैजापुर येथील व्यायाम शाळेचे बांधकाम साहित्य पुरविल्याबाबतच्या उर्वरीत रकमेच्या बीलाचा चेक पंचायत समिती वैजापुर येथून मिळवून देणेसाठी विजय सरकटे, सेवा निवृत्त शाखा अभियंता, पंचायत समिती वैजापुर, जि. औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे ११०००/- रु लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद येथे तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने विजय सरकटे, सेवा निवृत्त शाखा अभियंता, पंचायत समिती वैजापुर, जि. औरंगाबाद यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे ११,०००/- रुपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दिनांक १३/०३/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, विजय सिताराम सरकटे, सेवा निवृत्त शाखा अभियंता, पंचायत समिती वैजापुर, जि. औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन ११,०००/- रुपये लाचेची रक्कम राहते घरी - श्रीनिकेतन कॉलनी, औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे क्रांतीचौक, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद चे पोलीस अधिक्षक मा. श्री. अरविंद चावरीया, अपर पोलीस अधिक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. संदीप राजपुत यांनी केली आहे. त्यांना पोना अरूण उगले, गोपाल बरंडवाल, बाळासाहेब राठोड, पोशि गुसिंगे, चालक चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-**1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

13/03/20

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.